## ...राच्या आराधनेचें पुस्तक.

गोपिनाथ सदाशिवजी हाटे,
यांनीं रचिलें.

पद.

भजन करा श्री जगद्गुरूचें, जाइल जन्म वांयां रे ॥ ध्रु० ॥ सत्वर येउनि प्रेमें त्याच्या, घाला मिठि दृढ पायां रे । निर्मल करुनी मन हें अपुलें, या सन्निध प्रभुराया रे ॥ १ ॥ सत्सुख त्याच्या सन्निध लाभे, तेथें मग कां ना या रे । षड्रिपुंनीं ही व्यापिलि कैशी, अमोल्य तुमची काया रे ॥ २ ॥ जाळुनि त्यांना देइल मुक्ति, ऐशा ईशा ध्याया रे । आठवुनी त्या जयजयकारें, मंगलरूपा गाया रे ॥ ॥ ३ ॥ भजन० भक्तिसुधा. पृ. ५०.

मुंबईंत,

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

दिंडी.

आज भजनाचा दिवस सुदिन जाणा ।
गाउ आनंदें अपण देवराणा ॥
जया पदीं मिळे सूख अमुप राशी ।
पार कोठें मग या सभाग्याशी ॥ १ ॥
वर्णितां ज्या शीणले वेदचारी ।
तोचि परमात्मा भक्त जना तारी ॥
ज्याचि सत्ता वा विख्यात असे भारी ।
तोचि ईश हा विघ्नें सर्व वारी ॥ २ ॥
जया इच्छेनें सर्व होय कांहीं ।
तया सारीखा देव दुजा नाहीं ॥
ज्यासि ह्मणताती पूर्ण दयासिंधू ।
दीन दासांचा असे सखा बंधू ॥ ३ ॥
ज्याचि कीर्ती वा गाति अहर्नीशीं ।
तोचि जगदिश्वर सर्व गूणराशी ॥
जया कृपेनें अपण असों सूखी ।
त्याचि स्तूती न होय एक मूखीं ॥ ४ ॥

ना. ल. धुळेकर.

संग्रांक : ८३

# स्तवनाची पदें.

राग झिंजोटी–ताल त्रिवट.

गा हो जगपति जगवंदन । ब्रह्म सनातन पातकनाशन ॥ ध्रु० ॥ एक देव त्रिभुवनपरिपालक । कृपासिंधु सुंदर भवनायक ॥ गा हो० ॥ १ ॥ सेवक-मनोरथ-पूरण-कर्ता । विद्या-संपद-बुद्धि-प्रदाता॥ प्रार्थी चरण भक्त करजोडुनी। देई प्रेम सुचित्त चकोरा ॥ गा हो० ॥२॥ प्रार्थनासंगीत १ ५.

राग काफी–ताल त्रिवट.

तारक श्रीजगदीश्वर मानुनि । आनंदें शरण रिघा ॥ जन हो ॥ तारक० ॥ ध्रु० ॥ दीनसखा वरदायक तो प्रभु । नाशील सकल अघा ॥ जन हो० ॥ १ ॥ भावबळें मन सुस्थिर करुनी । गा प्रेमें अनघा ॥ जन हो० ॥ ॥२॥ विहित संतोषीं मंगल ध्यानीं । धुवा मनोमळ अवघा ॥ जन हो० ॥३॥ नित्य सुखास्तव अनुदिन सेवा । नामामृत कामदुधा ॥ जनहो० ॥ ४ ॥ प्रा० सं० १८.

राग झिंजोटी–ताल एका.

मना सावध सावध सावध त्राणा रे ॥ मना० ॥ ध्रु० ॥ क्षणिक सुखाचा लोभ धरुनियां । नको भुलूं त्रिभुवनराणा रे ॥ मना० ॥ १ ॥ होउनि निश्चल अनुदिन भावें । करिं मंगलगुणध्याना रे ॥ मना० ॥ २ ॥ नित्य सुखावरि

देउनि दृष्टि । तुच्छ करीं धनमाना रे ॥ मना० ॥ ३ ॥ या नरतनूचें सार्थक करिं बा। आठवीं पुरुष पुराणा रे॥ मना० ॥ ४ ॥ प्रा० सं० १७.

राग भैरवी–ताल त्रिवट.

वद वद वद वद मनुजा मधुर नाम वाचे । हर हर भव आपदांसि त्यजुनि भय जनाचें ॥ ध्रु० ॥ सोडुनियां लोभ सकल चित्त करुनि परम विमल । भक्तिरसें कर प्रेमल भजन मंगलाचें ॥ वद० ॥ १ ॥ अति विनयें करूनि नमन अर्पुनियां हृदय सुमन । दृढ भावें करि पूजन जगद्वंदनाचें ॥ वद० ॥ २ ॥ सावध हो करिशि काय जन्म अखिल व्यर्थ जाय । आठवि प्रभु जो हरि भय शरणागताचें ॥ वद० ॥ ३ ॥ प्रा०सं०१७.

राग भैरवी–ताल त्रिवट.

वद नामचि तें सार । रसने वद० ॥ ध्रु० ॥ गोरस मधुरस इक्षुरस सुधारस । नवरस ते हि असार ॥ रसने० ॥ ॥१॥ तळमळसी किति करिसी कीं हे । वेडे वेडे चार ॥ रसने० ॥ २ ॥ भक्त मयूर कृपाघन ईश्वर । उघडिल मुक्तिद्वार ॥ रसने० ॥ ३ ॥ प्रा० सं० २०.

## आवाहन.

हे सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्ति परमेश्वरा जो तूं एकच, अनादि, साक्षात्, नित्य, निराकार देव आहेस,

रं ९।९।४३

जो तूं या सकल ब्रह्मांडाचा उत्पन्नकर्त्ता, चालक व नियंता आहेस, व त्यांतील सर्व प्राण्यांचें जीवन, आधार व सुखाचें स्थाम आहेस, जो तूं आमचा पिता, शास्ता व त्राता आहेस, तो तूं, आह्मी जीं तुझीं अज्ञान बालकें अति लीनतेनें व नम्रभावें तुजपुढें आलों आहों, त्या आह्मांस तुझे मानसपूजेपासून आनंद पावण्यास, तुझी अचिंत्य शक्ति, अगम्य लीला, अगाध ज्ञान, अपार वैभव व अनंत गुण यांचा विचार करून तुजविषयीं पूज्यत्वबुद्धीनें आपलें अंतःकरण परिपूर्ण करून घेण्यास, तुझे अपार दयेस्तव आभार मानण्यास, आमचे असंख्य अपराधांची तुजपाशीं क्षमा मागण्यास व तुझें प्रेम संपादण्यास शक्तिमान् कर.

## भजन अथवा स्तवन.

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म ॥ आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥
शान्तं शिवमद्वैतम् ॥ शुद्धमपापविद्धम् ॥ १ ॥

हे प्रभो, तूं खरा साक्षात् परमेश्वर आहेस. तूं जागृत जीवंत देव आहेस. तूं विश्वाचें जीवन आहेस. तूं सजीव प्राण्यांचे चेतनेचा प्रभव आहेस. तुजशिवाय एक क्षणभर सुद्धां आमची स्थिति होणार नाहीं.

अभंग.

जगताचा तूं आधार । जगताचें तूंचि सार ॥ १ ॥

तूंच केली जगदुत्पति। करिशी तूंच त्याची स्थिति॥२॥
तूंच जगताचें जीवन। तुझेठायीं रंगो मन ॥ ३ ॥
भ० सु० ७७, प्रा० सं० ३०.

पद—राग बेहाग—ताल त्रिवट.

तूं मेरे प्राण आधार॥ प्रभुजी०॥नमस्कार दंडवत बंदना अनेकवार जाऊं वार ॥ प्रभु० ॥१॥ उठत बैठत सोवत जागत। ये मन तुजही चितार ॥ प्रभु० ॥२॥ सुखदुःख मनकी सबही बर्था। तुजही आज्ञा सार ॥ प्रभु०॥३॥ तूं मेरे वट बल बुद्ध धन तुमही। तूं मेरे परवार ॥ प्रभु०॥ ॥ ४ ॥ जो तुम करो सोईं फल हमरे। पेख नानक गुरु चरणार ॥ प्रभु०॥ ५ ॥ प्रा. सं. १२.

दिंडी—राग पिलू—ताल एका.

सख्या भगवंता सृष्टिच्या सुमित्रा। परम पुरुषा हे चिन्मया पवित्रा। आमुच्या तूं आधार शिथिल गात्रा। तुझी भक्ति वा पापहारिमात्रा ॥ १ ॥ अखिल ब्रम्हांड प्रभो तूज गातें। तूंचि आश्रय वा एकला जगातें। तुझें आमुचें मी काय वदूं नातें। कोण मानव तो शके वर्णूं तूतें ॥ ॥ २ ॥ प्रा. सं. २६.

हे सत्यस्वरूपा, जगत्कारणा, विश्वाधारा, आमच्या जीवांच्याजीवा, आम्ही तुला नमन करितों.

हे प्रभो तूं नित्य परमेश्वर आहेस. तूं स्वयंभू आ-

 काव्य ६१

हेस. तुला आदि नाहीं तुला अंत नाहीं. तुझ्या गुणानां सीमा नाहीं. तूं तेजोराशि, अमूर्त व अव्यंग आहेस.

श्लोक—भुजंगप्रयात.

'नसे आदि ज्या वा नसे ज्याहि अंत ।
जया मंगला वानिती साधुसंत.'

हे अविनश्वर पुराण पुरुषा, आम्ही तुला नमन करितों.

हे प्रभो, तूं सर्वज्ञ आहेस. तूं त्रिकालज्ञ आहेस. तुझें ज्ञान अनंत आहे. तुझे ज्ञानाचा यत्किंचित् अंश प्राप्त करून घेण्यास आम्हांस कोट्यावधि युगें घालविलीं पाहिजेत. या सृष्टींत यच्चयावत् जे प्राणी आहेत ते सर्व प्रकारें तुजवर अवलंबून आहेत. तूं त्यांस पोशितोस, त्यांचें संरक्षण करितोस व त्यांचें वांछित पुरवितोस. त्या सर्वांची चिंता तुला आहे. तर या सर्वांस पुरी पडणारी व वागवणारी जी तुझी अद्भुत शक्ति ही सर्वज्ञ असलीच पाहिजे.

दिंडी.

'सर्व सृष्टीही तुझाची पसारा ।
तुझ्या इच्छेनें चलित निराकारा.'

हे प्रभो, तुझ्या अनुपम चातुर्याचे अगणित दाखले स्थूल पदार्थांची व प्राणिमात्रांची त्वां जी अपूर्व घटना केली आहेस तिजवरून ढळढळीत दिसून येतात व आह्मास मानसिक शक्ति देऊन त्यांचा बाहेरील

जगाशीं जो सर्वोत्कृष्ट जम ठेविला आहेस त्या वरू-
न तुझें अपरिमित चांगुलपण व अपार ज्ञान प्रदर्शित
होतें.

हे प्रभो, तूं सत्यसिंधु आहेस. तूं सत्याश्रय आ-
हेस. तूं सच्चिदानंद आहेस. तूं अच्युत आनंदधाम
आहेस. तुझें प्रेम हृदयीं भावितां आनंदलहरी सुटतात.

पद–राग यमन–ताल चौताल.

ध्याउंया। सत्यसनातन जो प्रभु पूर्ण ज्ञान आनंद॥ध्रु०॥
निराकार जो शुद्ध। शांतिरूप परमात्मा सर्वात्मा जग-
चालक अद्वैत शिव अनंत॥ ध्याउंया०॥१॥ प्रा.सं. ८.

हे सर्वज्ञ, सकलगुणनिधान आम्ही तुला नमन
करितों.

हे प्रभो, तुझी शक्ति अचिंत्य आहे. जिचे उदरांत
पृथ्वी पेक्षां मोठे असे अगणनीय गोल लक्षा-
वधि मैलांचे अंतरानें व अतर्क्य गतीनें परिभ्रमण क-
रित आहेत अशा त्वां निर्मिलेल्या सृष्टीकडेस जेव्हां
आम्ही नजर लावितों व तिचा अवाढव्यपणा, वैभव
व सौंदर्य यांचें मान करूं लागतों तेव्हां आमची मति
अगदीं कुंठित व गुंग होते. असें आहे तरी ही विशा-
ल सृष्टि तुझ्या पायांखाली मोहरीच्या कणा सारिखी
आहे. हे प्रभो, तुजसमान थोर दुसरा कोण आहे! तुझे
उच्चतेचें परिमाण कोण करील!

पद.

'नकळे त्याचा अंत कदाही, एवढा देव महान ।
होय न आह्मांलागिं तयाच्या, सामर्थ्याचें मान.'

हे सर्व शक्तिमान् परमेश्वरा, आम्ही तुला नमन करितों.

हे प्रभो, तुझें सौंदर्य सर्वत्र ठिकाणीं पसरलेलें आहे. या जगताचा सोज्ज्वल व तेजोमय दीपक जो सूर्य, शीतप्रकाश चंद्र, चमकणारे अगण्य तारे, नीलवर्ण आकाश, विशाल सागर, अनंत प्राण्यासह ही सृष्टी, हीं तुझे विस्तीर्ण राज्याची व अनिश वैभवाची साक्ष देतात.

'कोटि चंद्र परकास झुलत है चले आपने गतमो'

पद–राग बरुवा–ताल त्रिवट.

गगनमे थाल रवि चंद्र दिपक बनी है । तारक मंडल जनक मोतीरे ॥ धुप मलय पवन चामर करे । सगल बन राजी फुलंत ज्योतीरे ॥ कैसी आरती तेरी भव खंडण तेरी आरती रे । अनाहत सबद बाज्यंत भेरीरे ॥

नानक.

हे प्रभो सहस्त्र मुखांनीं हें जगत् तुझा महिमा वर्णीत आहे. चोहोंकडे तुझ्याच नांवाचा जयध्वनि उठत आहे. हे सकलैश्वर्यसंपन्न परमेश्वरा आम्ही तुला नमन करितों.

हे प्रभो, तूं सर्वव्यापी आहेस. तूं स्वस्वरूपें स्फूरद्रूप सर्वत्र आहेस. तूं परात्पर अंतरसाक्षी आहेस. तूं हृदयभुवनदीप आहेस. तूं प्रेमसिंधु व हृदयरंजन आहेस.

पद–राग देस–ताल त्रिवट.

महिम्या तुझ्या न तुला । प्रभुजी महिम्या तुझ्या न तुला॥ ध्रु०॥चक्षु न देखे कर्ण न ऐके। रसना न चाखे तुला ॥ प्रभु० ॥ १ ॥ परि तूं देवा व्यापिशी विश्वा । दृश्य हृदीं सकलां ॥ प्रभु० ॥ २ ॥ इंद्रिय कैंवी परिमित-ग्राहक । ग्रहणकरी निष्कला ॥ प्रभु० ॥ ३ ॥ हृदयीं प्रकटुनी आनंदोर्मि । उठविशि तूं विमला॥ प्रभु०॥४॥ ह्मणउनि दीना ओढुनि जवळीं । दावि पदा अढळा ॥ प्रभु० ॥ ५ ॥ प्रा० सं० ३.

हे हृदयनिवासिन्, अन्तरात्मन्, आह्मी तुला नमन करितों.

हे प्रभो तुझे विश्वनेत्रापुढें कोणतीच गोष्ट लपवितां येत नाहीं. आमची बाह्य स्थिति व आमच्या अंतःकरणांतील अगम्य खांच कोपऱ्यांत लपून राहिलेल्या पापवासना तूं जाणतोस.

श्लोक–इंद्रवज्रा.

'आहे प्रभो रे तुज ठाउकें हें।केलें किती ह्या जनिं पाप देहें.'

पद–राग कलंगडा–ताल त्रिवट.

सृष्टिस्रष्टा अज सर्व समर्थ परमेश्वर तो हा । सद्रूप संनिध आहे पहा ॥ ध्रु० ॥ न धरीं दुर्जनसंग कदापि दुःखद अंतर्दाहा। निषेधक संनिध आहे पहा॥ सृष्टि०॥ घालुनी चित्त असारीं कां हें उधळीशी वय आहा।

पुसणार सन्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ २ ॥ नको अ-
न्यायमार्गें चालूं जोडेल पाप महा । शास्ता हा स-
न्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ ३ ॥ प्रा. सं. १५.

हे सर्वसाक्षी, सर्वज्ञ परमेश्वरा, आम्ही तुला नमन करितो.

हे प्रभो, तूं परम पवित्र आहेस. तुझें स्वरूप विमल आहे. पापाचा तुला किमपि स्पर्श व्हावयाचा नाहीं. तुझ्या शुद्ध विमल स्वरूपाचा प्रकाश चोहींकडे पडत आहे. तुझ्या समक्ष पाप्यांची अंतःकरणे विमल होतात.

श्लोक– शार्दूलविक्रीडित छंद.

'ज्या ध्यातां भजतां कदापि न वळे, वृत्ती कुमार्गा प्रती।
जो रक्षी अवघे दयार्द्र जग तो, तारी आह्मा भूपती '.

पद.

स्मरतां नित्य हरी । मग ते माया काय करी ॥ ध्रु० ॥
श्रवणें मननें अद्वय भजनें । पळतो काळ दुरी ॥ मग
ते० ॥ करुणाकर वरदायक जो हरी । ठेवी हात शिरीं
॥ मग ते० ॥ शाम निरंतर प्रभु चरणीं । अमृत पात
करी ॥ मग ते० ॥ नवनित० ३३१.

पद–राग भैरवी–ताल त्रिवट.

वद वद वद वद रसने नाम मंगलाचें । कर कर कर
सार्थक या अतुल जीवनाचें ॥ ध्रु० ॥ अति सुंदर तनु हि
सकल क्षणीं एक होय विकल । ह्मणुनि स्मरीं चरण-
कमल अनिश प्रभुवराचें ॥वद०॥१॥ तोचि दीनबंधु ह-

रिल प्रेमें अति जाड्य अखिल। सद्भावें हृदय भरिल स्वीय सेवकाचें ॥ वद० ॥ २ ॥ कोण प्रभूवीण सदय सत्कार्यीं देइल जय। घोर दुःख टाळिल भय दीन अनाथाचें ॥ वद० ॥ ३ ॥ आठवि तरी जगदीश्वर तोचि एक भवभयहर। भजन अति प्रेमल कर निशिदिनीं तयाचें ॥ वद० ॥ ४ ॥ भ० सु० ५८. प्रा० सं०१८.

हे मंगला, आम्ही तुला नमन करितों.

हे प्रभो, तुझें कारुण्य अपार आहे. त्वां आह्मावर आजपर्यंत अपरिमित उपकार केले. तूं आमचें पित्याप्रमाणे पोषण केलेंस. तूं आमचें जीवित, आमची शरीरसंपत्ति, आमची प्रापंचिक सुखें, आमची बुद्धि, आमची स्वतंत्रता हीं आजपर्यंत रक्षलीस. दुःसह अशा महान् महान् दुःखांतून व दुर्घट प्रसंगीं आमचे रक्षणार्थ कृपास्त्र टाकून पार पाडिलेंस व दिवसानुदिवस तूं आपले कृपेची वृष्टि आह्मावर करित आहेस.

साकी.

'नाहीं रे पारावारा। जगदीशा तव उपकारा.'

पद—राग काफी—ताल दीपचंदी.

तूझी ममता अनंत। हे प्रभु तूझी ममता अनंत ॥ ध्रु०॥ दीनदयाळा हे जनपाळा। आम्हासि लागे न अंत ॥ हे प्रभु० ॥ १ ॥ विस्मृति पडतां सेवा न घडतां। होतसे मानसिं खंत ॥ हे प्रभु०॥ २ ॥ सेवेंत असतां द्रव्य हि

स अल्पं ८३
६२ [illegible]



नसतां । असुं आम्हि लक्ष्मीवंत ॥ हे प्रभु० ॥ ३ ॥ अद्भुत लीला गातां दयाळा । शिणलेहि साधूसंत ॥ हे प्रभु० ॥ ४ ॥ आनंदकंदा शाश्वतसुखदा । संसार हाचि दुरंत ॥ हे प्रभु० ॥ ५ ॥ पातक नाशन विघ्नविभंजन । तारिं आह्मा भगवंत ॥ हे प्रभु० ॥ ६ ॥ भ० सु० ५६. प्रा० सं० ५.

हे प्रभो, तूं आमच्या सर्व सुखाचा उगम व दाता आहेस.

श्लोक–शार्दूलविक्रीडित छंद.

'देशी सौख्य अपार पार न दिसे, देवा तुझ्या शक्तिला.'

ज्यांहीं करून आह्मांस सुख व आनंद होईल अशा असंख्य पदार्थांनीं त्वां ही सृष्टी कशी परिपूर्ण केली आहे ! दृष्टीस वेधक, जिव्हेस रसिक, घ्राणेंद्रियास सुवासिक, कर्णास मधुर व स्पर्शेंद्रियास मृदु अशा ह्या जगांत तूं किती वस्तु निर्माण केल्या आहेस व त्या पासून आह्मास सुख व्हावें ह्मणून आमच्या इंद्रियांची व मानसिक शक्तींची रचना किती आश्चर्यकारक केली आहेस.

श्लोक–शिखरिणी.

दया सिंधो देवा । अनुपम तुझी होय करणी
न साधे कोणा ही । रुचिर असली सृष्टिसरणी
कशी केली नेणों । अमित सुखभांडार धरणी
दिली वाटे आह्मा । प्रभु तदुपभोगास वरणी.

रत्नमाला. ६०.

श्लोक–पृथ्वीछंद.

सुखास्तवच आमच्या । अति अपूर्व केली धरा
कमी किमपिही नसे । जिजमधें यशः श्रीधरा.

रत्नमाला. ५४.

हे प्रभो, तुझ्या ह्या सृष्टीपासून अनंत जीव पदोपदीं सुख व आनंद पावताहेत. कोट्यावधि नरनारी तुझे दयेचे आभार मानून तुझ्या मंगल नामाचा जयजयकार करित आहेत.

पद–राग खमाज–ताल चौताल.

गाउंया तयाचें नाम । रचिलें ज्याणें विश्वधाम । दयेशीं ज्याचे नाहीं विराम । वाहे सतत धारें ॥ ध्रु० ॥ ज्योति ज्याचें गगनीं गगनीं । कीर्ति भाति अतुल भुवनीं । प्रीति ज्याची पुष्पितवनीं कुसुमित नवरागें ॥ गाउंया०॥ ॥ १ ॥ ज्याचें नाम दुःखशमन । पापहृदयतापहरण प्रसाद ज्याचा शांतिरूप भक्तहृदयीं जागे ॥ अंतहीन निर्विकार । महिमा ज्याच्या होय अपार।ज्याच्या शक्तिवर्णनीं शिणति बुद्धिवाणी ॥ गाउंया० ॥ २ ॥

प्रा० सं० १४.

हे कृपाघना, हे सौख्यदात्या, आह्मी तुला नमन करीतों.

हे प्रभो, तुझें व आमचें जें अत्यंत प्रिय नातें तें पूर्णपणें समजलें असतां आमचे आनंदास पार नाहीं, व जेव्हां त्यास अनुसरून आमची सर्व कृत्ति घडेल ते-

ऱ्हां आमच्या भाग्याचें कोण वर्णन करूं शकेल ! हे प्रभो, तूं आमचा पिता, गुरु व कालत्रयीं सखा आहेस.

पद–राग जोगी–ताल त्रिवट.

त्रिभुवनका तुम नाथ बिराजत सुखका सब हो दाता ।
सबही तुम हो आप्त हमारा पिता माता भ्राता.

प्रा० सं० ११.

पद–राग जोगी–ताल एका.

साधुवृंद ज्या गाय रे । ध्याउं तयाचे पाय रे ॥ आम्हां सकलां बंधुजनांचा जो कां बापमाय रे ॥ध्रु०॥ सर्व शक्तिमान रे । अनंत पूर्ण ज्ञान रे ॥ दया क्षमा शांति यांचें। होय अधिष्ठान रे ॥ साधु० ॥ १ ॥ भाविक मनोविराम रे । ठाके घेतां नाम रे ॥ पीडित जन जे त्यांलागीं तो । हृदयाभिराम रे ॥ साधु० ॥२॥ संकटीं घे धांव रे । घेउनि दया नाव रे । नेउनि सोडी पैल तीरा। रंक न पाहे राव रे ॥ साधु० ॥३॥ तारणीं प्रवीण रे । आतर भक्तीवीण रे ॥ नलगे देणें उरला कैंचा । भवसागरीं शीण रे ॥ साधु० ॥ ४ ॥ गाउं मंगलधाम रे । देइल सुख विश्रामरे ॥ सुविमल चित्तें लीन होउनी । तया करूं प्रणाम रे ॥ साधु० ॥ ५ ॥

प्रा० सं० २०.

हे प्रभो, तूं परम न्यायी आहेस. तूं दुष्ट व पापी मनुष्यांचा शास्ता व सज्जनांचा कैवारी आहेस, तुला राव

आणि रंक हे सर्व समान आहेत. हे प्रभो जेव्हा आह्मी तुझे परम विमल व न्यायी स्वरूपाचा विचार करून असें मनांत आणितों कीं थोडेच वर्षांत कदाचित् थोडेच घटकानीं आह्मास तुझे न्यायासना पुढें उभें राहवें लागेल व आमच्या अनेक कृत्यांचा व त्वां दिलेल्या अनेक देणग्यांचे व्ययाचा तुला हिशेब द्यावा लागेल तेव्हां आमचे आंगी रोमांच उभे राहतात. हे राजाधिराज आह्मी तुझ्या आज्ञांचा पदोपदीं भंग केला.तुझे पवित्र नियमांचें उल्लंघन केलें. पापांच्या राशी व अपराधांच्या कोटी करून ठेविल्या आहेत. आह्मी आपला पवित्र आत्मा अनाचार डोहांत बुडविला आहे. येणे करून आह्मी तुझे महत् शिक्षेस पात्र झालों आहों. आह्मी तुझ्या अमोल्य देणग्याचा अयोग्य उपयोग केला. जो वेळ आह्मी सदाचारांत, परोपकारांत व तुझे प्रिय उद्देश सिद्धीस नेण्यांत घालवावा तो आह्मी आळसांत, खेळण्यांत व कुमार्गीं लावला. आह्मी आमचे प्रिय बंधुधर्मास मुकलों. आह्मी तुजवर सर्व प्रकारें अवलंबून राहिले असून आह्मावर तुझे अद्भुत दयेचा वर्षाव क्षणोक्षणीं होत असतां ही आह्मी तुला विसरून तुजशीं अधमपणाने वागलों. मोह, मद, गर्व, कपट , द्वेष इत्यादि दुर्विकारांचे अधीन होऊन अविनश्वर सुख सोडुन नाशवंत स्वार्थ मात्र साधला. या सर्व गोष्टींचा आह्मास अत्यंत खेद व

पश्चात्ताप होतो व मोठी भीति ऊत्पन्न होते. आतां तुला आम्ही आपलें तोंड काय दाखवावें ! आह्मी इतके हतभाग्य कसे झालों ? आह्मी असे निरर्थक प्राणी कसे जन्मलों ? असे भुमीस भार होण्या पेक्षां आह्मी उपजतांच कां मेलों नाहीं. आह्मी इतके पापी व अधम झालों तरी हे प्रभो तुज वांचून आम्हास दुसरा कोण तारक आहे ? जरी तूं परमन्यायी आहेस तरीं तुझें वात्सल्य अपरिमेय आहे.

साकी.

करुणार्णव तूं असशी देवा । त्वद्गुण मी किती वानूं
कोण असा रे सदय असे कीं । त्या तुज सम मी मानुं.
भ० सु० ३८.

हे प्रभो,तूं पतित पावनआहेस. तूंदीनदयाघन आहेस. जे तुला खऱ्या अनुतापी अंतःकरणानेशरण येतात त्याचें तूं अंतःकरण शुद्धकरून आपले कडेस वळवितोस. तर हे दीनदयाळा जे आह्मीं तुजला अनन्य भावें व अत्यंत खेदयुक्त व पश्चात्तापी अंतःकरणाने शरण आलों आहों त्या आह्मास शुद्ध अंतःकरण देऊन पावन कर.

पद–राग बेहाग–ताल त्रिवट.

पतितपावन दीनदयाघन करुणाकर देवा । अनन्य भावें सकल हि प्रेमें करूं तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ अधम पा-

तकी अनाथ आह्मी न कळे हित आपुलें। क्षणिक सुखातें नित्य मानुनी मन विषयीं रमलें । धनमानादिक संचित करणें सार्थक हें गमलें । मोह विपिन अति गहन या मध्यें चित्त सुचिर भ्रमलें ॥ चाल ॥ यांत कोण आमुतें तारिल प्रभु आतां । पातक नाशन दीनानाथा तूंचि मोक्ष दाता । करूं नको उपेक्षा तुजविण नाहीं आह्मां त्राता ॥ कामादिक रिपुमेळा निवटुनि दाविं स्वहित ठेवा । जगदुद्धारा तव भजनाचा असो सदा हेवा ॥ पतित० ॥ १ ॥ प्रा० सं० १.

पद—राग धनाश्री—ताल त्रिवट.

दीनदयाळा तारक तूं एकाचि आह्मां । देउनि भक्ति सांभाळुनि ने निजधामा ॥ ध्रु० ॥ विश्वाधारा अद्भुत हें मानुषजन्म । चिच्छक्तीचें निर्मियलें मंगलधाम । सुखसाधन या दीधला इंद्रियग्राम । पारि न स्थिर हें न कळे बा आह्मा वर्म ॥ दीन० ॥ विसरूनि तुजला गुंतलों मायाजाळीं । सार्थक न घडे व्यर्थाचि या पिंडा पाळी । गांठिल काळ न गमे बा कोणे वेळीं । तळमळ चित्ता मायबाप संकट टाळीं ॥ दीन० ॥ परोपकारें सार्थक हो या देहाचें । मंगल नामें गाउं आह्मी अनुदिन वाचे । तव गुण ध्यानीं विनटो हें मानस अमुचें । पुरवी सखया वांछित हें निजभक्तांचें ॥ दीन० ॥ ३ ॥

प्रा० सं० २.

ठाणे

दिंडी—राग पिलू—ताल एका.

असों देवा तव चरणिं आम्ही लीन। शरण आलों लेंकुरें तुझीं दीन ॥ करूं तूझें प्रेमळ नामगान । जोंवरी या देहांत पंच प्राण ॥ १ ॥ थोर आह्मी अपराधि दीनबंधू । घेइं पदरीं आह्मांसि कृपासिंधु ॥ नित्य भावें तूजला दास वंदू । सेवुं आनंदें नाम सुधाबिंदु ॥ २ ॥

प्रा० सं० २७,

पद—राग कल्याणीचा मांझ—ताल त्रिवट.

हरिल अघभार करिल भवपार । विश्वाचा आधार । गाहो गाहो जगदोद्धार ॥ ध्रु० ॥ धनमानादिक नश्वर ऐहिक ॥ लोभ नको अनिवार ॥ विश्वाचा० ॥ १ ॥ नानापरिच्या विषयवासना । चित्ता करिति विकार ॥ विश्वाचा० ॥ २ ॥ सुविमल चित्तीं भाव करा दृढ । सोडा दंभ असार ॥ विश्वाचा० ॥ ३ ॥ सत्संगातें जोडुनि प्रेमें भजन करा अनुवार ॥ विश्वाचा० ॥ २ ॥

प्रा० सं० १९.

## ध्यान.

असा जो एकच, अनादि, नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, सर्वज्ञ, सर्वशक्ति, सर्वव्यापि, आनंदमय, निराकार, सर्वांचा उत्पन्नकर्त्ता, कल्याणनिधान, कृपानिधि, परमपवित्र, परमन्यायी, पतितपावन, सकलगुणैश्वर्यसंपन्न परमात्मा त्याचें आपण क्षणभर ध्यान करूं. तो आह्मां-

वर दया करून आह्मांपुढें उभा राहो आणि आपल्या पावन करणाऱ्या, शांती व आनंद देणाऱ्या अशा समागमाचा अनुभव आह्मांस घडेल असें करोः

पद–राग बहार–ताल एका.

देखितां तुझ्याचि या अतुल प्रेम आननीं । काय भय संसार शोक- घोर-विपद- शासनीं ॥ ध्रु० ॥ अरुणोदयीं अंधार जेंवि जाय जगत सोडुनी । तेंवि देव तुझें ज्योति मंगलमय विराजितां भक्तहृदय वीत शोक होय तुझ्या दर्शनीं ॥ देखितां ० ॥ १ ॥ तुझी करुणा तुझें प्रेम हृदयीं प्रभो भावितां । उमळे हृदय अश्रुधारा धरिल कोण दाबुनी । जय करुणामय जय करुणामय तुझे गुण गाइं मी । जाय जरी जावो प्राण तुझ्या पद साधनीं ॥ देखितां ॥ २ ॥ प्रा ० सं० ११.

पद–राग काफी–ताल दीपचंदी.

जगदीशचरणारविंद । खरा हाचि स्वानंद ॥ ध्रु० ॥ त्याच्या पदाविण सर्वहि तो शिण । सेवुनि व्हावें कां मंद ॥ खरा० ॥ १ ॥ विसरूनि त्याला विषयहाला । पिऊनि कां व्हावें धुंद ॥ खरा० ॥ २ ॥ सुखसद्माचा पदपद्माचा । बहु सुरभी मकरंद ॥ खरा० ॥ ३ ॥ भक्तिभावें प्रभुला ध्यावें । जो मूळ सद्गुणकंद ॥ खरा० ॥ ४ ॥ मन दिनरजनीं जागो तद्भजनीं । लागो प्रभुचा छंद ॥ खरा० ॥ ५ ॥ प्रा० सं० १९.

## प्रार्थना.

हे परम ईशा, तुझ्या चरणारविंदीं येण्यापासून आह्मांस आज जो अतिशय आनंद प्राप्त झाला त्या साठीं आह्मी तुझे फार आभारी आहों. असा सुदिन आह्मांस नित्य येवो व तुझे वरदायक मंगल हस्त आमचे शिरीं सदा राहोत. आह्मांस तुझें खरें स्वरूप जाणण्यास व तुजवर सर्व प्रेम जडविण्यास शक्तिमान् कर. हे पित्या, तुझें सत्य आमचे मनांत निरंतर वास करो. आमचीं मनें तुझ्या गुणांनीं प्रफुल्लित राहोत व तुझ्या प्रीतिरूप किरणांचा आनंदमय प्रकाश आमचे मनावर सदा पडो. कसाही प्रापंचिक मोह प्राप्त झाला तरी तुजपासून आमचीं मनें कधीं ढळूं देऊं नको. अधोगतीस नेणारी जी तुझी विस्मृति ती आम्हांस न पडो. त्वत्पदीं आमचें खरें, अमोलिक व अपरिमेय कल्याण आहे असें आमच्या मनांत ठसोंदे. अति प्रेमल भावानें तुझें वंदन करण्यास आम्हांस साहाय्य कर. आमचे मनोभ्रमर तुझ्या पदकमलीं सदा दंग राहोत. तुझ्या कारणीं आमचें मन तत्पर राहो. परोपकारीं आमची काया झिजो. तव कीर्तिप्रसरणीं आमची वाचा झटो.

हे प्रभो, कायिक, वाचिक व मानसिक पापापासून आम्हांस दूर राख. आमच्या मनांत पापवासनांचें व सद्भावांचें जे सदैव युद्ध चालत असतें त्यांत सद्भावांचा

नेहमी जय होईल असें कर. तूं सर्वसाक्षी सर्वज्ञ आहेस म्हणून तुजपासून आम्हांस कांहींच लपवितां येत नाहीं. तूं सर्वसमर्थ व परम न्यायी आहेस हें जाणून आम्हांस पापमार्गीं जाण्यास तुझी भीति सदा वाटूं दे. तुझ्या आज्ञेचें उल्लंघन करून मिळविण्या सारिखा ह्या जगांत कोणताच लाभ नाहीं व आम्हांस कितीही ऐश्वर्य प्राप्त झालें तरी तुझ्या पदप्राप्तीपुढें तें कांहींच नाहीं अशी आमचे मनाची पूर्ण खात्री होऊं दे. आम्हांस पापांचा अनुताप वारंवार होवो. हे दयामय परमेश्वरा, आम्हांस आमचे अपराधांची क्षमा कर व आमचे हातून पुनः पाप न घडेल असा मनाचा निग्रह करण्याचें सामर्थ्य आह्मांस दे.

साकी.

भक्तवत्सला करुणागारा, प्रार्थितसें मी भावें । शुद्ध करुनियां अंतर माझें, संतत तेथ वसावें ॥ १ ॥ कृतार्थ व्हावें तव दासानें, सज्जन संग घडावा । प्रभु अविचारें दुर्जनपंथीं, पाय कधीं न पडावा ॥ २ ॥ देवा अनुदिन परोपकारीं, माझा देह झिजावा । विनय होउनी सुस्थिर हृदयीं, सकलहि दुर्मद जावा ॥ ३ ॥ प्रा० सं० २४.

हे प्रभो, सत्याचा आमचे मनांत उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावो व तुजवरील आमचें प्रेम दिवसेंदिवस वृद्धि पावो.

असतो मा सद्गमय तमसो मा
ज्योतिर्गमय मृत्योर्माऽमृतं गमय.

बृहदारण्यकोपनिषत्.

हे प्रभो, असत्यांतून आम्हांस सत्याप्रत ने, अंधकारांतून प्रकाशांत ने, आणि मृत्यूच्या पाशांतून सोडवून आम्हांस अमृतत्व दे.

हे करुणानिधे, आयुष्यरूपी जी आमची नौका ती या भवसागरांतील मदमत्सर कामक्रोधादिक भोंवऱ्यांत सांपडून गटकळ्या खात आहे व केव्हां बुडून जाईल याचा नेम नाहीं. तर हे दयानिधे, अशा संकटप्रसंगीं आम्ही अति लीनतेनें तुझी करुणा भाकितों, तर तूं धांव आणि आपल्या कृपेच्या लहरी सोडून आम्हांस निजसुखधामास सुरक्षित ने.

पद—राग भैरवी—ताल त्रिवट.

पाव प्रभो करुणाकर तारक । धांव कृपानिधि हे भवनायक ॥ ध्रु० ॥ हे जगदीश्वर दीनजनोद्धर । हा भव दुस्तर यांतुनि उद्धर ॥ पाव० ॥ १ ॥ दुर्धर कामादिक रिपु छळिती । पाव जगत्पति सेवक हितकर ॥ पाव० ॥ २ ॥ दीनशरण भयहरण करीं त्वरें । प्रेमभरें स्तवि हा तव किंकर ॥ पाव० ॥ ३ ॥ प्रा० सं० १.

पद—राग पिलू—ताल दीपचंदी.

प्रभुविण संकट कोण निवारी ॥ ध्रु० ॥ दीन सखा

तरि कोण असा कीं । दुःख हरी भय वारी ॥ प्रभु० ॥ १ ॥ संकटसमयीं शरण रिघावें । कोण असा कैवारी ॥ प्रभु० ॥ २ ॥ कोण असा कीं षड्रिपुयांची । हटविल थोर सवारी ॥ प्रभु० ॥ ३ ॥ व्यथित जिवांना कोण सदय तो । देइल शांतिमवारी ॥ प्रभु० ॥ ४ ॥ दास विनवितो मजवरि देवा । सोडिं कृपेचें वारी ॥ प्रभु० ॥ ५ ॥ रत्नमाला. १०. प्रा० सं० १०.

हे जगज्जनका, तुझा व आह्मा सर्वांचा जो अति प्रिय संबंध त्यावरून पाहिलें असतां आह्मी सर्व मानवप्राणी भाऊबहिणी आहोंत, तथापि अभिमानामुळें, किंवा दुर्लक्षामुळें, किंवा स्वताचेच सुखाकडेस लक्ष देऊन आह्मी आपले प्रिय नात्यास विसरलों आहों. तर असें न होतां आह्मांस त्यांचा सदां कळकळा व काळजी वाटूं दे व त्यांचें इहलोकींचे व परलोकींचे हिताकरितां झटण्याचें सामर्थ्य दे व अति प्रिय अशी जीं आमचीं मातापितरें, बायकांमुलें, व इतर आप्तसंबंधी, त्यांच्या मनांत तुझ्या भक्तिलतेचें बीजारोपण करून त्यांस तुझ्या अपरिमेय सुख पदाची प्राप्ति करून देण्यास आह्मांस साहाय्य कर.

दिंडी.

'विश्वपाला हा विनवि दीन पायां ।
न हें जाऊंदें जन्म अखिल वांया ॥
झटो क्षणभरी नाशवंत काया ।

दयादृष्टीनें स्वजनहित कराया.'

हे प्रभो, ह्या जगीं आमचें कर्तव्य काय व आमचा परिणाम काय होणार यांचें आह्मांस निरंतर स्मरण दे. आमचें जीवित नाशवंत व क्षणभंगुर आहे, काळ मोठ्या वेगानें पळत आहे व इहलोकींचीं सर्व सुखें अशाश्वत व तुच्छ आहेत, हें आमच्या मनांत सदा वागूं दे. आह्मी आजपर्यंत आपला पुष्कळ वेळ निरर्थक व पापाचरणांत घालविला व त्यांत जन्माचें कांहींच सार्थक केलें नाहीं, तर पुढील राहिलेला थोडा जो काळ तो तरी तुझ्या सेवेंत व तुझीं प्रिय कार्यें करण्यांत घालविण्यास आह्मा दीनांस मदत कर. हे भगवन्, आमचे आयुष्याचा प्रत्येक दिवस ही तुझी मोठी देणगी आहे असें समजून आह्मांस त्याचा योग्य व्यय करण्यास मदत दे. आह्मी मृत्यूच्या मुखांतच आहों. तो आह्मांस केव्हां गिळील याचा नेम नाहीं.

'को हि जानाति कस्याद्य मृत्युकालो भविष्यति.'

तुझी प्राप्ति करून घेणें हेंच आमच्या ह्या जन्माचें सार आहे असें आमच्या ध्यानांत वागूं दे. आमची सर्व इच्छा तुझ्या इच्छेनुरूप चालण्याची असो व आमचा सर्व आनंद तुझ्याठायीं असो.

पद.

॥ मना ईशपदारविंद सदा भ्रमर होई रे ॥ ध्रु० ॥

पद.

देवा दे चरणाचा संग । गिळितो काळ भुजंग ॥ ध्रु०॥

पद —"उद्धवा शांतवन कर जा"— या चालीवर.

संसारिं गुंतलों परी हें, मन लागो प्रभु तव चरणीं ॥ ध्रु०॥ तुजविण हे मंगलधामा, अन्य न मजला थारा । प्रेमें मीं गाउनि कीर्ति, आठवितों तव उपकारा । नाम तुझें मजला वाटे, अति मधुरा अमृतधारा ॥ (चाल) किति तरि मी पापें मळलों । दुर्मदें किति मनिं जळलों । सन्मार्गा पासुनि वळलों ॥ अति दुःसह माझी करणी ॥१॥ संसारिं०॥ त्रैकाळीं तुजला ध्याती, संत मुनी विनटुनि ध्यानीं । ध्यानाविण मार्ग तुझा तो, कधिं न कळे या भवरानीं । विषयाच्या गोडीनें या, देहाची होते हानी ॥ (चाल) काया ही जाइल वांयां । सांडिल मज धन सुत जाया । धरिं तरि मी दृढ तव पायां । होऊ तुज प्रिय ही सरणी ॥२॥ संसारिं०॥ सुस्थिर मी करिं मन माझें, तोडुनियां भ्रांतीपाशा । कर जोडुनि विनवीं तूतें, ये झडकरि भवभयनाशा ॥ ठेवियला तुजवरी भार, भक्तांची या पुरवीं आशा ॥ (चाल) भावें तुज पापनगारी । सकळही स्तवुं नर नारी । अवघ्या या पतितां तारीं । हो सुखकर आह्मां स्मरणीं ॥ ३ ॥ संसारिं० ॥

भ० सु० ५४.

अभंग.

तुझ्या चरणीं माझा भाव । प्रभु दृढतर लाव ॥ १ ॥

सदानंदा तूझ्या पदा । जडो माझी आशा सदा ॥ २ ॥
तुझ्या पायीं माझा हेत । देवा राहो सदोदित ॥ ३ ॥
स्वामी न करिं उदास । अति दीन तूझा दास ॥ ४ ॥
प्रा० सं० ३१.

आरती.

जयदेवा सर्वेश्वरा । कृपासिंधू जी दातारा ॥ शरण आह्मी निजभावें । तुह्मां करुणागारा ॥ ध्रु० ॥ जमलों आह्मी याचि ठाया । देवा तुझे गुण गाया ॥ निरसुनी मोहमाया । देईं ठाव तुझिया पायां ॥ १ ॥ गांजिती हे षड्वैरी । देवा आह्मां परोपरी ॥ तुवां रक्षावें निर्धारी । भवसिंधू पार करीं ॥ २ ॥ तुझ्या सेवेंत तरले फार । देवा नाहीं अंत पार । लीला तुझी अगोचर । किती वर्णूं मी पामर ॥ ३ ॥ आतां मागणें एक आहे । देवा देसी तरी पाहें॥ आह्मी सर्व सुखी राहो। सदा तुझी भक्ति लाहो ॥ ४ ॥ ना० ल० धुळेकर.

## भक्तिपर अभंग.

नेणें कैसा आलों कोठें तो मी जाय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ १ ॥ नेणें जन्मा आलों कराया तें काय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ २ ॥ नेणें भक्तीविणें मुक्तीतें उपाय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ ३ ॥ व्हावया कृपे-

शीं पात्र प्रभूराय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ ४ ॥

२

स्नेहरूपें आह्मा माता पिता भ्राता । भवडोहीं त्राता देवा तूंची ॥ १ ॥ अरिष्टांत थार संकटांत धीर । विपत्तींत स्थीर संपति तूं ॥ २ ॥ क्लेशीं समाधान श्रमांत विसावा । अंतकाळीं देवाआधार तूं ॥ ३ ॥ इष्ट लाभ तूंची आमुचा शाश्वत ॥ ओढी आशा हात पायीं तुझ्या ॥ ४ ॥

३

पतित मी पापी शरण तूज भावें । पाप निर्दाळावें देवराया ॥ १ ॥ नाहीं नाहीं मज अन्य कोणि त्राता । तारीं बा अनाथा कृपासिंधु ॥ २ ॥ दिनाचा दयाळ दासांचा कनवाळ । दुःष्टांचा तूं काळ जगदीशा ॥ ३ ॥ तारियेले भक्त देवा तूं अनंत । नकळे तूझा अंत पूर्णब्रह्मा ॥ ४ ॥

४

कामादीक वैरी गांजीती अंतरीं । तूं माझा कैवारी सर्वेश्वरा ॥ १ ॥ मान अपमान क्षणिक हें घन । यांत नको मन परात्परा ॥२॥ संपत्ति विपत्ति असो कैशि स्थिति । नसे त्याची खंती दीनबंधु ॥ ३ ॥ हाची माझा हेत तुझे ठायीं चित्त । राहे हें निश्चित दीनानाथा ॥ ४ ॥

५

व्हावी मोक्षप्राप्ति पतितपावना । हीच माझ्या मना एक

आस ॥ १ ॥ आस तूं मनींची जाणशी सकळ होउनी कृपाळ पुरीव ती ॥ २ ॥ न ती पुरविशी तरि कोठें जावें । काय तें करावें अव्हेरील्या ॥ ३ ॥ अव्हेरील्या तुवां नेणता रे बाळ । करी तळमळ अंतरीं तो ॥ ४ ॥ अंतरीं न तूतें ठेवियेलें जेणें । व्यर्थ त्याचें जीणें दास ह्मणे ॥ ५ ॥

६

सर्व भावें आलों तुजची शरण । काया वाचा मनासहित देवा ॥ १ ॥ आणीक दुसरें नये माझे मना । राहिली वासना तुझे ठायीं ॥ २ ॥ माझीये वरीचें कांहीं जड भारी । तुजवीण वारी कोण देवा ॥ ३ ॥ तुझे आह्मी दास आमचा तूं धनी । चालत दुरूनी आलों मागें ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुह्मी तारिले बहुतां । माझी कांहीं चिंता असो देवा ॥ ५ ॥

प्रा० सं० ४०.

पद.

तुझें आचरण पाहुनि येतें, डोळ्यांला पाणी । कां करितोसी हे मनुजा, तूं अपुली रे हानी ॥ ध्रु० ॥ दोदिवसांचा प्रपंच यासी, का रें भुललासी। त्यांतच मानुनि सुख तूं मनुजा, कैसा रे रहासी॥ धनसुतदारा आप्त यांसि तूं, आपुलें रे ह्मणसी। यांच्या मोहें भुलुनि कसा तूं, सदाच भटकसी ॥ या परिवारासाठीं नाना, कर्मै तूं करिसी। अपुले ह्मणुनि विश्वास यांचा, अखंड तूं धरिसी ॥ हे तर तुजला फसविति अंतीं, मनुजा मनिं आणीं। कां करितोसि हे मनुजा तूं, अपुली रे हानी ॥ ॥१॥ परमदयाळू हा जगदीश्वर, आपुला रे धणी। ही मानव तनु दिधली त्यानें, कृपाळु होऊनी॥ त्यातें विसरुनी कां तूं फिरसी, या दुर्घट रानीं। होइल गति पुढती तुज कैसी, हें आणिं रे ध्यानीं॥ तोचि रक्षिता प्रभु सर्वेश्वर, अणी अपुला धनी। शरण रिघावें अनन्य भावें, नमना त्या करुनी॥ त्यावांचूनीं नाहिं गती हें, वदति वेद वाणी। कां करितोसी हे मनुजा, तूं आपुली रे हानी ॥२॥ अधम अपण सर्वस्वी आह्मीं, हें मनिं जाणावें। शरण प्रभुला जाउनि त्यासी, नित्य भजत जावें॥ आज्ञा त्याची मानुनि लोकीं, आपण वर्तावें। तेणें उतराई या मानवदेहाचें व्हावें॥ त्याविण साधन जीवा कांहीं, अणिक न शोधावें। हेंचि जाणुनी मनीं प्रभूला, सदा आळवावें॥ हाचि मार्ग वा सुगम सौख्यकर, मोक्षाची खाणी। कां करितोसी हे मनुजा, तूंआपुली रे हानी॥३॥

ना० ल० धुळेकर.